Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-XII | Dec. | 2016

**Address**
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

**Email**
- aiirjpramod@gmail.com

**Website**
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हयातील वणी क्षेत्रातील कोळसा खनिज संसाधनाचा आदिवासी जमातींच्या व्यवसायावर होणारा परिणाम :एक भौगोलिक अध्ययन"

प्रा.योगेंद्र एस.नगराळे
(भूगोल विभाग प्रमुख)
डॉ.श्वेता स्मुती आर्टस अॅन्ड होमसायन्स वूमेन्स कॉलेज
धापेवाडा, जि.गोंदीया.

**सारांश**

भारत हा वनसंपदेने समृद्ध असा देश होता. या देशात पुर्वीपासूनच वनांत अनेक आदिवासी जमाती आढळत होत्या. भारतातील सर्वच राज्यात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. भारतात २०११ च्या जनगणनेनुसार ९ टक्के आदिवासी जमात आहेत. आदिवासी जमातींचे वास्तव्य हे मुख्यत: दुर्गम दऱ्याखोरे,जंगल किंवा डोंगराळ प्रदेश असतो. या जमातीचे जिवन हे निसर्गावर अवलंबून आहे. त्यांची आर्थिक स्थीती ही अत्यंत हलाखीची आहे. यवतमाळ जिल्हयातील वणी क्षेत्र कोळसाखाणीसाठी प्रसिद्ध आहे. या कोळसाखाण क्षेत्रात अनेक आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. आदिवासी लोकांच्या वास्तव्यामुळे वणीला आदिवासी क्षेत्र म्हणून महाराष्ट्र शासनाने जाहीर केले आहे.येथे कोळसाखाण क्षेत्रातील खेडयांत अनेक आदिवासी जमातीची घरे आढळतात. वणीमध्ये कोळशाचे साठे मिळाल्याने अनेक लहान मोठे उद्योगधंदे हे कोळशावर आधारीत आहे. या क्षेत्राचा विकासच कोळसामुळे झाला आहे. कोळसा क्षेत्रामुळे वणीला प्रगतीकडे नेत असतांना या क्षेत्रातील आदिवासी जमात मात्र अत्यंत उपेक्षित व हलाखीचे जीवन जगत आहे. वणीतील कोळसाखाणीमुंळे ईथल्या आदिवासी जमातीपुढे अनेक व्यवसायाच्या समस्या निर्माण होत आहे म्हणून या जमातीतील व्यवसायाचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**बिजसंज्ञा** खनिज संसाधन, कोळसाखाण, आदिवासी जमात, व्यवसाय.

## प्रस्तावना

पूर्वी वनांत निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी जमाती वनांतून निघुन ईतर जमातीच्या संगतीने जिवन जगत आहे. ईतर जमातीप्रमाणे आपलीही जीवनपद्धती असावी, आधुनिक संस्कृतीशी आपला संबंध यावा म्हणून हा जमात खेडयांत, नगरात वास्तव्य करीत आहे. अर्थाजनासाठी शेती करणे, पशुपालन करणे, मजुरी करणे असे विविध व्यवसाय हा जमात करीत आहे. आधुनिक जमातीची अर्थव्यवस्था ही प्रगत आहे परंतु आदिवासी जमातीची अर्थव्यवस्था ही आजही उदरनिर्वाहाची आहे. त्यांचे व्यवसाय काही प्रमाणात आजही पारंपारीक असून यात अजूनही परिवर्तन झालेले दिसून येत नाही. भारतातील खनिज संसाधनाच्या प्रदेशात अनेक आदिवासी जमातीच्या वसाहती आढळतात. खनिज संसाधनाद्वारे एकिकडे भारताचा औद्योगिक विकास होतांना खनिज संसाधन क्षेत्रात आदिवासी जमातीची व्यावसायीक स्थीती अत्यंत भीषण आहे. यवतमाळ जिल्हयात वणी येथे कोळसा खनिज संसाधन क्षेत्र आहे या ठिकाणी आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे प्रमाण खूप मोठे आहे.कोळशाचे अमर्याद भंडार असल्याने आदिवासी जमातीचें योगदान कोळसा व्यवसायात दिसून येत नाही परिणामी हा जमात विकासात मागे पडत आहे. कोळसा खनिज संसाधनाचा या जमातीच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. ईतर जमातीप्रमाणे या जमातीला व्यावसायीक विकासाची गरज आहे.

**अभ्यासक्षेत्र**

**यवतमाळ जिल्हा वणी कोळसा खाण क्षेत्र**




महाराष्ट्र राज्य हे नैसर्गिक व खनिज संपदेने संपन्न असे राज्य आहे. या राज्यात यवतमाळ जिल्हयात वणी येथील भूगर्भात कोळसा या खनिज संसाधनाचे साठे आढळते. वणी तालुक्याचा अक्षांश विस्तार २० अंश ६ ते ७८ अंश ९५ पुर्व रेखांशादरम्यान आहे. वणीचा विकास कोळसाक्षेत्रामुळे झाला आहे. वणी येथे अनेक कोळसाखाणी आहेत परंतू निलजई, कोलगाव, नायगाव मुगोंली, कोलारपिंपरी या कोळसा खाणींचा अभ्यास संशोधन पत्रिकेत केला आहे. वणी कोळसा क्षेत्रातील खेडयांत गोंड, परधान, कोलाम या आदिवासी जमातीची अनेक घरे आहेत. आदिवासी जमातीचे वास्तव्य या क्षेत्रात जास्त असल्याने वणी तालुक्याला आदिवासी क्षेत्र म्हणून महाराष्ट्र शासनाने घोषीत केले आहे. भारत सरकारच्या अधिपत्याखाली असणारी (Western Coalfield Limited) पश्चिम कोळसा क्षेत्र अंतर्गत या ठिकाणी अनेक कोळसाखाणी आहेत. या कोळसा खाणीतून लाखो टन कोळसा भूर्गभातून काढून त्याचा व्यवसाय केला जातो. कोळसाखाणीचे क्षेत्र असूनदेखील ईथे वास्तव्यास असलेल्या आदिवासी जमातीला कोळशावर आधरीत लघू व्यवसाय करण्यासाठी कोणतेच प्रोत्साहन मिळाले नाही तसेच त्यांना कोळसावर आधारीत लघु व्यवसायाचे परवाने मिळाले नाही. त्यामुळे या जमातीचा आर्थिक विकास ज्या गतीने व्हावयास पाहिजे होता त्या गतीने झाला नाही.कोळसा खनीज समृध्द प्रदेश असूनही या जमातीपुढे विविध आर्थिक व व्यावसायीक समस्या निर्माण झाल्या आहेत ज्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**संशोधनाचा उद्देश** प्रस्तुत संशोधन पत्रिकेचा मुख्य उद्देश वणी कोळसा क्षेत्रातील आदिवासी जमातीवर व त्यांच्या व्यवसायावर होत असलेला कोळसाखाणीचा परिणाम दाखविणे व आदिवासी जमातीचे व्यावसायीक वर्गिकरण करुन वर्णन करणे हा आहे.

**माहिती संकलन व संशोधन पद्वती** प्रस्तूत संशोधन पत्रिका ही प्राथमिक व दुय्यम माहितीवर आधारीत आहे. यवतमाळ जिल्हयातील वणी कोळसा क्षेत्रातील आदिवासी जमातीवर कोळसाखाणीचा होणारा परिणामांचे अध्ययन करण्यासाठी प्राथमिक माहिती वणी क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या वसाहतींना भेटी देउन त्यांच्याशी संवाद साधून प्राप्त केली आहे. दुय्यम माहिती ही कोळसाखाणी जवळच्या गावातील ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, कृषी अधिकारी कार्यालय वणी येथून मिळविलेली आहे तर प्रत्यक्ष सहभाग व निरीक्षण पद्धतीचा उपयोग करुन माहितीचे विश्लेषन केले आहे.

**माहितीचे विश्लेषण** यवतमाळ जिल्हयात वणी कोळसाखाण क्षेत्रातील खेडयांत आदिवासी जमातीच्या वास्तव्याचे प्रमाण खूप मोठे आहे. याठिकाणी गोंड, परधान, कोलाम या आदिवासी जमातीच्या वसाहती आढळतात. येथिल आदिवासी जमातीची बोलीभाषा गोंडी, मराठी, आहे. वणी कोळसा क्षेत्रातील या जमातीचे व्यवसाय हे त्याच्यांतील जातीनूसार भिन्नभिन्न आढळते.

**तक्ता क्र.१ वणी कोळसा क्षेत्र व आदिवासी जमातींची लोकसंख्या**

| अ.क्र. | कोळसा क्षेत्र | गावातील एकूण लोकसंख्या | आदिवासी जमातींची लोकसंख्या | आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण (टक्केत) |
|---|---|---|---|---|
| १ | निलजई | ७२० | १८६ | २५.८३ |
| २ | कोलगाव | ६२२ | १३४ | २१.५४ |
| ३ | मुंगोली | ६९७ | १९७ | २८.२६ |
| ४ | नायगाव बे. | ७८९ | २०२ | २५.६० |
| ५ | कोलारपिंपरी | ५८१ | १३२ | २२.७१ |
| | एकूण | ३४०९ | ७४६ | २१.८८ |

**स्त्रोत** : ग्रामपंचायत कार्यालय




तक्ता क्र. १ नूसार वणी कोळसा क्षेत्रातील निलजई कोलगांव मुंगोली नायगांव बे. व कोलारपींपरी या क्षेत्रात एकूण ३४०९ लोकसंख्या आहे. त्यापैकी आदिवासी जमातीची लोकसंख्या ७४६ आहे. मुंगोली या कोळसाखाण क्षेत्रातील खेडयात आदिवासी जमातीची लोकसंख्या जास्त आढळते. त्या नंतर निलजई, नायगाव बे.या गावांचा क्रमांक येतो. तर सर्वात कमी आदिवासी जमातीची लोकसंख्या कोलारपिंपरी या गावात आढळते.वणी कोळसाखाण क्षेत्रातील गावात ईतर लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जमातीच्या लोकसंख्येचे एकूण प्रमाण २१.८८ टक्के आहे.

एकेकाळी वनांत आढळणारा व नैसर्गिक संसाधनावर आपली उपजिवीका भागविणारा आदिवासी जमात आज ईतर जमातीबरोबर खेडी गावात वास्तव्य करुन आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती रोजमजूरी व लहानमोठया स्वरुपाचे व्यवसाय करीत आहे. या जमातीतील स्त्रीया आणी पुरुष हे अत्यंत कठोर परिश्रम करणारे असून धैर्यवान व शक्तीशाली आहेत. यवतमाळ जिल्हयात वणी कोळसाखाण क्षेत्रात अनेक आदिवासी जमातींचे वास्तव्य असले तरीही त्यांच्यात आढळणाऱ्या जमातीनूसार व्यवसायात फरक दिसून येतो.

**तक्ता क्र.२ कोळसा क्षेत्रातील आदिवासी जमातींचे व्यावसायीक वर्गिकरण**

| अ.क्र. | व्यवसाय | आदिवासी जमातींचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| १ | शेती | २२ टक्के |
| २ | पशुपालन | ८ टक्के |
| ३ | रोजमजुरी | ४० टक्के |
| ४ | औद्योगिक श्रमिक | १२ टक्के |
| ५ | ईतर व्यवसाय | १८ टक्के |

**स्त्रोत**:ग्रामपंचायत कार्यालये,तलाठी कार्यालये,कृषी कार्यालय वणी

Fig. 2
Wani Coal Field
Tribal Community Business (%)




**आदिवासी जमातीचे व्यावसायीक वर्गिकरण**

**१.शेती व्यवसाय** वणी कोळसा खाण क्षेत्रात आदिवासी जमातीला शासनाकडून शेती मिळालेली आहे. काही आदिवासी बांधवांनी या क्षेत्रात आपल्या कष्टाने शेती विकत घेउन मोठया कष्टाने कृषी व्यवसाय करीत आहे.कोळसाखाण क्षेत्रातील २२ टक्के आदिवासी जमात हा शेती व्यवसाय करतांना आढळतो. कोळसाखाण क्षेत्रातील आदिवासी जमातीची शेती ही संपुर्णत: पावसावर अवलंबून असलेली कोरडवाहू शेती असून पावसाळयात शेतीतून कापूस,सोयाबिन,तूर ईत्यादी पिकांचे उत्पादन घेण्यात येते.वर्धा नदीच्या खोऱ्यात सूपिक जमिनी असून काळी कसदार कापसाची मृदा या क्षेत्रात आढळून येते.निलजई,कोलारपिंपरी या ठिकाणी शेती करण्याचे प्रमाण जास्त आहे.आदिवासी जमातीची शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे शेतीतून होणारे एकरी उत्पन्न अत्यंत नगण्य आहे. हा जमात पारंपारीक पद्धतीने शेती करीत असून यांच्या शेतीत आधूनिक तंत्रज्ञान वापराचा अभाव दिसून येतो. केवळ आपल्या कुटुंबाची अन्नधान्याची गरज भागवू शकेल एवढेच उत्पन्न शेती व्यवसायाने मिळते तर कधी तेवढेही उत्पन्न मिळत नाही. घरात अठरा विश्व दारिद्रय आढळते. या जमातीपुढे सिंचनाच्या सुविधा,बॅकेचे अत्यल्प कर्ज,आधुनिक अवजारांचा अभाव,योग्य दर्जाचे बियाणांसाठी भांडवलाचा अभाव असे शेतीचे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत.

**२.पशुपालन** आदिवासी जमातीला पशूपालन करणे हे फार पुर्विपासूनच अवगत आहे याचे कारण घनदाट जंगलात व अत्यंत दुर्गम भागात असणारे आदिवासी जमातीचे वास्तव्य होय. वणीतील सर्वच कोळसाखाण क्षेत्रात ८ टक्के आदिवासी जमात हा पशूपालन व्यवसाय करुन आपल्या दैनंदिन गरजा भागवितो.पशूपालन व्यवसायात गाय,म्हैस,शेळी पाळणे त्यांपासून दुध,दही,तुप,लोणी तयार करणे व गावात किंवा वणी शहरात नेउन विकण्यासाठी पशूपालन केले जाते.कोलगांव व मुंगोली या ठिकाणी पाळीव प्राण्यांची संख्या मोठी आहे. तसेच कोंबडया,बकऱ्या पाळणे त्यांना मांसासाठी विकणे त्यातून आपल्या अन्न, वस्त्र, निवारा या दैनंदिन गरजांची पुर्तता करण्यासाठी आदिवासी जमात हा पशूपालन व्यवसाय करतांना आढळतो.

**३.रोजमजुरी** वणी कोळसाखाण क्षेत्रातील फार मोठा आदिवासी जमात हा रोजमजुरी करतांना आढळतो.या जमातीतील रोजमजुरी करण्याचे प्रमाण ४० टक्के आहे.शिक्षणाचा अभाव आणी गरिबीमुळे या जमातीतील पुरुष व स्त्रियांना रोजमजुरीवर अवलंबून राहावे लागते. या जमातीतील पुरुष आणि स्त्रिया हया शेतातील पिके कापणे ,कचरा कापणे,कापुस वेचणी व ईतर कार्य करणे ई. शेतमजुरी करतात. त्यातून या जमातीला १५० ते २०० रु.मजुरी मिळत असते.ग्रामिण रोजगार हमी योजनेतून मिळालेली कामे,वणी व घुग्गुस शहरातील बांधकामे तसेच मिळेल ती कामे करुन हा जमात आपली उपजिवीका भागवित आहे. दररोज कामाच्या शोधात ग्रामिण भागाकडून वणी व चंद्रपूर यासारख्या शहरी भागाकडे आदिवासी जमातीचे स्थलांतर होतांना दिसून येते.नायगांव बे.आणी कोलारपिंरी या क्षेत्रात रोजमजूरीसाठी स्थलांतर खूप होते.

**४.औद्योगिक श्रमिक** वणी हे कोळसाखाण क्षेत्र असल्याने वणी तालूक्याचा औद्योगिक विकास होत आहे.या क्षेत्रात अनेक कोळसाखाणी आहेत.वणी येथे काही भूमिगत कोळसाखाणी तर काही खुल्या कोळसाखाणी असून कोळसाखाणीत काम करण्याचे आदिवासी जमातीचे प्रमाण १२ टक्के आहेत. गावाजवळच कोळसाखाण असल्याने निलजई,कोलगाव,मुंगोली,नायगाव बे.कोलारपिंपरी खाणीतून कोळसा काढण्यासाठी येथे श्रमिकांची आवश्यकता पडते. आदिवासी जमातीतील पुरुषांना ट्रकमध्ये कोळसा भरणे, दगड फोडणे, अशी जड कामे मिळतात. ज्या आदिवासी जमातीच्या शेतजमिनी कोळसाखाणीत (Coal

Bearing Aqquisition Act) नूसार गेल्या आहेत अशाच लोकांना कोळसाखाणीत स्थायी स्वरुपाची नौकरी मिळालेली आहे. काही आदिवासी बांधवांची शेती कोळसाखाणीत जावूनही अजून त्यांना मोबदला मीळाला नाही.परंतू अधिकारी पदावर नौकरी करणाऱ्यांचे प्रमाण या जमातीत अत्यंत कमी आहे. याचे कारण येथिल पुरुषांत शैक्षणीक व तांत्रिक शिक्षणाचा अभाव असल्याने ते जड कामे करण्यातच धन्य होतात. कोळसा खनिज संसाधनाने समृध्द प्रदेश असला तरी या क्षेत्राातील आदिवासी जमातीला कोळसाच्या लघुउद्योगासाठी कोणतेच परवाने मिळालेले नाही.

**५.ईतर व्यवसाय** आदिवासी जमातीतील १५ टक्के लोक ईतर व्यवसाय करत आहे.गावातच छोटी किराणा दुकाने, पानठेला, चालविणे, रिक्षा चालविणे, आठवडी बाजारात कपडयाचे व ईतर दुकाने मांडणे असे व्यवसाय हे लोक करतात. या व्यवसायासाठी लागणारा माल हा वणी नागपूर, चंद्रपुर या शहरातून आणला जातो. या जमातीतील काही तरुण शासकिय नौकरी करीत आहेत. आपल्या दैनंदिन गरजा पुर्ण होण्यासाठी कोणतही व्यवसाय करुन आदिवासी जमात जिवन जगत आहे. ईतर जमातीप्रमाणे हा जमात फारसा प्रगत नसूनदेखील आपल्या दैनंदिन गरजा भागविणे ऐवढेच आर्थिक उद्दिष्टे डोळयासमोर ठेवून व्यवसाय करत आहे. ज्या प्रमाणे वणीमध्ये कोळसा खनिज संसाधन मिळाल्याने शासनाचे वणीकडे लक्ष आहे. आदिवासी जमातीकडे एक मानव संसाधन म्हणून त्यांच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले तर ही जमात देखील आपल्या व्यवसायात प्रगती करु शकेल.

**कोळसाखाण क्षेत्राचा आदिवासी जमातीच्या व्यवसायावर होणारा परीणाम**

वणी कोळसाखाण क्षेत्रात आदीवासी जमात आपला उदरनिर्वाह करण्यासाठी जे काही व्यवसाय करीत आहे त्यावर कोळसाखाणींचा मोठा परिणाम दिसून येतो तो असा

**१. शेती व्यवसायावर होणारा परिणाम** –

वणी कोळसाखाण क्षेत्रात आदिवासी जमातीला शासनाकडून ज्या जमिनी मिळाल्या होत्या त्या वर्धा नदिच्या खोऱ्यात अत्यंत सूपिक व शेतीसाठी उपयुक्त शेतपट्टे होते.कोळसाखाणीसाठी जमिनी हस्तगत केल्याने त्यांना जमिनीच्या स्वरुपात स्थायी नौकरी किंवा पैसा देण्याचे ; ॅमेजमतद ब्वंसपिमसक स्पउपजमकद्ध पश्चिमी कोळसा क्षेत्राने ठरविले.करारानूसार आदिवासी जमातीला पैसा व नौकरी मिळालेली आहे तर काही आदिवासी बांधवांना अजूनही जमिनीचा योग्य मोबदला मिळालेला नाही.शासनाकडून मिळालेला मोबदला हा अत्यंत कमी असून आजही आंदोलने चालू आहे.शासनाने कोळसाखाणीसाठी जमिनी अगोदरच घेवून ठेवल्याने व जमिनीचा योग्य मोबदला मिळावयास विलंब होत असल्याने या जमातीला शेती व्यवसाय करता येत नसून त्यांच्यासमोर बेरोजगारी व व्यवसायाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.यात निलजई,कोलगाव,मुंगोली या गावातील आदिवासी जमातीचे प्रमाण जास्त आहे.

**२. रोजमजूरीवर होणारा परिणाम** –

वणी कोळसाखाण क्षेत्रात शेती व्यवसाय हा प्रमुख व्यवसाय असून यात काम करणाऱ्या आदिवासी जमातीचे प्रमाण जास्त होते.कोळसाखाणीसाठी शासनाने शेतजमिनी हस्तगत केल्याने शेतमजुरी मिळण्याचे प्रमाण कमी झाले असून रोजमजुरी मिळविण्यासाठी या जमातीला वणी चंद्रपुर या ठिकाणी भटकंती करावी लागत आहे.कोळसाखाणीत काम करणाऱ्या मजूरांना अल्पदरावर काम करावे लागत आहे.कोळसाखाणीला लागणारा मजूरवर्ग ठेकेदारी पध्दतिने असल्याने ईतर राज्यातून कमी खर्चात मजूर आणून काम करवून घेतात.यात छत्तिसगड मध्यप्रदेश आंध्रप्रदेशातील मजूर आहेत.या राज्यातील मजूरांकडून कोळसाखाणीत अल्पदरावर काम करून घेण्यात येते.परराज्यातिल मजुरांमुळे स्थानिक आदिवासी लोकांना रोजगाराच्या संधी मिळत नाही.

**३. ईतर व्यवसायावर होणरा परिणाम** –

वणी कोळसाखाण क्षेत्रात निलजई,नायगाव–बेलोरा हे संपूर्ण गावच कोळसाखाणीत गेल्याने येथिल गावांचे पूर्नवसन करण्यात आल्याने आदिवासी जमातीच्या लघु व्यवसायावर गंभिर परिणाम झाला आहे.या गावात पानठेला,किराणा दूकान असे लघूउद्योग चालवून जे आदिवासी बांधव आपला उदरनिर्वाह करित होते त्यांचे व्यवसाय बंद होउन स्थलांतर झाले आहेत.कोळसाखाणींसाठी क्षेत्र राखीव झाल्याने आदिवासी जमातीचेच नाही तर संपूर्ण निलजई नायगाव बेलोरा गावातील मानवी वसाहतींवर परिणाम झाला आहे.

**उपाययोजना** वणी कोळसा क्षेत्रातील आदिवासी जमातीची आर्थिक स्थिती जरी बिकट असली तरी महाराष्ट्र शासन व पश्चिम कोळसा क्षेत्राद्वारे परिस्थीती सुधारण्यासाठी खालील उपाययोजना करता येईल.

१. वणी क्षेत्र हे खनिज संसाधनाने समृध्द असल्यामुळे कोळसा क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या आर्थिक विकासासाठी शासनाने कोळसा खनिज निधींची राखीव तरतूद करावी. या राखीव खनिज निधीतून आदिवासी जमातीचे जिवनमान उंचावण्यात यावे.

२.वणी कोळसाखाण क्षेत्रातील आदिवासी जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांची अंमलबजावणी ग्रामस्तरावर होत आहे की नाही याकडे खनिज संसाधन विभाग व महाराष्ट्र शासनाने लक्ष दयावे.

३.आदिवासी जमातीच्या शेतीसाठी आवश्यक सिंचनसुविधा व आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करुन दयावे.आधूनिक तंत्रज्ञानाद्वारे शेतीचा दर्जा कसा सूधारता येतो यासाठी मार्गदर्शक शिबीरांचे आयोजन करण्यात यावे.

४.ज्या आदिवासी जमातीची शेती कोळसाखाणीसाठी गेली त्यांनाच नाही तर ईतरही आदिवासी जमातीच्या लोकांना कोळसा खाणीतील काही नौकऱ्या राखिव असाव्यात.

५. कोळसाखाण क्षेत्राजवळ लघुउद्योग स्थापन करण्यासाठी आदिवासी जमातीला भांडवल उपलब्ध करून दयावे तसेच त्यांना कोळसावर आधारीत लघूउद्योगांचे परवाने पश्चिमी कोळसा क्षेत्राने देण्यात यावे.

**निष्कर्ष** वणी कोळसाखाण क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या व्यावसायीक स्थितीवरुन असा निष्कर्ष काढता येतो की,

१. खनिज संसाधनाने वणी कोळसाखाण क्षेत्र समृध्द असूनदेखील आदिवासी जमातीची अर्थव्यवस्था ही निव्वळ उदरनिर्वाहाची आहे.

२. कोळसा क्षेत्रात वास्तव्य असूनही आदिवासी जमात दारिद्रय व गरीबीत जिवन जगत आहे.

३. वणी कोळसा क्षेत्रातील आदिवासी जमात औद्योगिकदृष्टया अत्यंत मागासलेला आहे.

४. या क्षेत्रातील आदिवासी जमात ईतर जमातीच्या तूलनेत विकासात मागे राहत आहे.

**संदर्भग्रंथ**

Naik Dr. Ranjana (2012) : "Socio Economic Study Of Tribals in Thane District", Unpublished Ph.D. Thesis, University of pune.

Husain majid (1996):Systematic Geography,Razvat Publications,Jaipur

Husain Majid (1999) : Population Geography, Anmol Publications Pvt. Ltd. New Delhi.

रथ गोविंदचंद्र (जानेवारी २०१४) : ''लेख विकासाबाबतचा आदिवासी दृष्टीकोन आणी नक्षलग्रस्त जिल्हयासाठींचा एकात्मीक कृषी योजना'', जर्नल माहिती आणी प्रसारण मंत्रालय, प्रकाशन विभाग, मुंबई.

पाटिल धनश्री दत्ता (ऑक्टोबर डिसेंबर २०१०) : ''महाराष्ट्रातील प्रधान आदिवासी जमातीचा एक अभ्यास'', हकारा क्वार्टरली जर्नल, महाराष्ट्र मानव विज्ञान पुणे.

नगराळे प्रा. योगेंद्र एस., लांजेवार डॉ. एच.डी. : (८–९ जानेवारी २०१५) लॅंडलेस लेबर अँड ॲग्रीकल्चर डेवलोपमेंट इन दी कॉन्स्टेक्ट ऑफ क्लायमेट चेंज पेपर पब्लीश ॲट यु.जी.सी. नॅशनल कॉन्फरन्स सोविनीयर ऑन ''यवतमाळ जिल्ह्यातील वणी क्षेत्रातील कोळसा खाणकाम व पर्यावरणीय संभाव्य धोके : एक भौगोलिक विश्लेषण'', डिपार्टमेंट ऑफ जिओग्राफी, बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा, (२३९–२४१).

नगराळे प्रा. योगेंद्र एस., (२२–२३ सप्टेंबर २०१६) : रेन वॉटर हारवेस्टींग : अ लाईफलाईन फॉर हयुमनवेल बिइंग पेपर पब्लीश ॲट यु.जी.सी. नॅशनल कॉन्फरन्स सोविनीयर ऑन ''यवतमाळ जिल्ह्यातील वणी कोळसा क्षेत्रातील खाणकामाचा भूमिगत जलसाठ्यावर होणारा परिणाम – एक भौगोलिक अध्ययन'', डिपार्टमेंट ऑफ जिओग्राफी, संत रामदास आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज घनसावंगी, (२८४–२८८).

पटले डॉ.बी.ए. (२०१३) : ''परिवर्तनीय आदिवासी पवरा जमात'', अथर्व प्रकाशन, जळगाव.

आगलावे डॉ.प्रदीप:(२०००) : ''संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे'', विद्या प्रकाशन, नागपुर.

मगर डॉ. जयकुमार (१९९२) : ''आर्थिक भूगोल'', विद्या प्रकाशन, नागपुर.